*अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत.*

## *महाराष्ट्र शासन*

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन पूरक पत्र क्रमांक :- मासाका २०१०/प्र.क्र.५२/विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० मार्च, २०१०.

वाचा:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.मासाका २००८/प्र.क्र.१५०/विघयो-२, दिनांक २२.५.२००८

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.मासाका २००९/प्र.क्र.२२०/विघयो-२, दिनांक २५.८.२००९

३) संचालक, समाजकल्याण यांचे पत्र क्र.सकर्स/अजाउयो-१/अजासस/ महात्मा फुले/अर्थसहाय्य मंजूरी/०९-१०/का-१४/९३, दि:२६.२.२०१०

४) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांचे पत्र क्र. डॉबाआंसंप्रसंपु/माऔसहसं/चौ अह/०९-१०/४४६, दिनांक : १५.३.२०१०.

<u>प्रस्तावना</u> :- दिनांक २७.२.२००४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना राज्यात कार्यान्वीत करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ५% रक्कम संस्थेने उभी करावयाची असून, ३५% भागभांडवल व ३५% शासकीय कर्ज देण्यात येते. तसेच उर्वरित २५% रक्कम संस्थेने वित्तीय संस्थेमार्फत कर्ज स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावयाची असते. यानुसार १ ते ३२ अटींची पूर्तता करणाऱ्या मागासवर्गीयांच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते.

मुळातच दुर्बल घटक म्हणून गणल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांनी सहकाराने उभ्या केलेल्या सहकारी संस्थांची आर्थिक स्थितीही दुर्बलच असते. अशा संस्थांना अर्थसहाय्य देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्याच्या उद्देशाने अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. सहकारी संस्थांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर ३-४ वर्षे प्रस्ताव प्रलंबित रहात असल्याने आर्थिक अडचणींमुळे ५% हिश्श्याची रक्कम काढून घेतात व मंजूरी मिळाल्यानंतर पुन्हा बँकेत जमा करतात. त्यामुळे शासन निर्णय, दिनांक २२.५.२००८ मधील अट क्र.४ बाबत होणारी अनियमितता तसेच काही संस्था शासनाच्या अथवा संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रकल्प जमिनीत बदल करतात असे आढळून आले आहे. यासाठी सदर शासन निर्णयातील काही अटींमध्ये खालील पूरक अटींचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन पूरक पत्र :- शासन निर्णय दिनांक २२/०५/२००८ मधील अट क्र.४,५, १०, ११, अट क्र.२ आणि अट क्र. २४ च्या अनुषंगाने खालील पूरक अटी विहित करण्यात येत आहेत :-

अट क्र. ४ (i) **संस्थेने प्रकल्प अहवाल सनदी लेखापाल यांचेकडून बनवून घेतला असला तरी त्यास संबंधित जिल्हयातील मिटकॉन शाखेकडून अथवा वित्तीय हमी देणा-या वित्तीय संस्थेकडून संमतीपत्र (प्रमाणपत्र) घ्यावे.**

अट क्र.५ (i) संस्थेला सुरुवातीला अर्थसहाय्य मंजूर करताना प्रथमतः एकूण प्रकल्प खर्चापैकी शासनाकडून देय असलेल्या अर्थसहाय्याच्या ५०% रक्कम मंजूर करण्यात येईल. मंजूर करण्यात आलेली रक्कम प्रकल्पाचे स्वरुप व संबंधित संस्थांची मागणी विचारात घेऊन प्रत्यक्षात वितरीत करण्यात यावी.

अट क्र.५(ii) **मंजूर संस्थांनी ५% स्व-हिश्श्याची रक्कम खात्यातून काढल्याचे आढळून आल्यास अशा संस्थांना प्रत्यक्ष निधीचे वितरण करताना संबंधित संस्थेने स्व-हिश्श्याची रक्कम परत खात्यात जमा केल्यास तसेच प्रकल्पास २५% अर्थसहाय्य करणा-या वित्तीय संस्थेकडून वित्तीय सहाय्य मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच निधी वाटप करण्यास सदर संस्था पात्र समजण्यात यावी.**

मात्र अशी रक्कम यापुढे संबंधित संस्थांना कोणत्याही परिस्थितीत काढता येणार नाही. जर असे आढळून आल्यास संबंधित संस्थांना दिलेली मंजूरी रद्द करण्यात येईल व दिलेला निधी व्याजासह एकरकमी वसूल करण्यात येईल.

अट क्र.१० (i) प्रकल्प उभारणीकरीताचा कमाल ५२ आठवड्याचा कालावधी शासनाकडून देय असलेले अर्थसहाय्य पूर्ण वितरीत केल्याच्या दिनांकापासून गणला जाईल.

अट क्र.११ (i) अर्थसहाय्याचा उर्वरीत / अंतिम हप्ता प्रकल्पाच्या सद्यस्थितीची पडताळणी केल्यानंतर आणि वितरीत केलेल्या पहिल्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र व वित्तीय संस्थांकडून मंजूर दिर्घ मुदतीच्या कर्जाचा पुरवठा प्राप्त झाल्यानंतर मंजूर करण्यात येईल. तथापि संस्थेस अर्थसहाय्य मंजूर केल्यानंतर एक वर्षाच्या आत अर्थसहाय्याचा उर्वरीत/अंतिम हप्ता मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक राहील.

अट क्र. २० (i) प्रकल्प मंजूर करतांना संस्थेने संपादित केलेल्या जमिनीमध्ये संस्थेस काही प्रतिकूल परिस्थितीत बदल करावयाचा असल्यास त्यांनी संचालक, समाजकल्याण, पुणे यांचे पूर्वपरवानगीने जागा बदल करता येईल. तथापि, संस्थेने सादर केलेल्या प्रकल्पाची जागा बदल्यास, मंजूर प्रकल्प खर्चामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होणार नाही याबाबत सदर जागेच्या कागदपत्राची पडताळणी करुन संस्थेस संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी परवानगी दयावी. अशी परवानगी मिळाल्याशिवाय संस्थेस प्रकल्प इमारत बांधकामास सुरुवात करता येणार नाही.

अट क्र. २४ (i) औदयोगिक सहकारी संस्थांच्या प्रकल्प अहवालांना तांत्रिक मान्यता देणारी वित्तीय संस्था ही प्रामुख्याने त्याच जिल्हयातील अथवा लगतच्या जिल्हयातील असावी .

हे आदेश यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या संस्थाना तसेच भविष्यात मंजूरी दिल्या जाणा-या संस्थांना लागू सहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्रमांक २००३३०२०३६२४००१ नुसार प्रसिध्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(जगदेव न. राठोड )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेय / लेखा परीक्षा ) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
प्रधान सचिव (सहकार ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (अर्थसंकल्प-४/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती- विघयो-२.